RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक १७८(४)] शुक्रवार, डिसेंबर २९, २०१७/पौष ८, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४२८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ डिसेंबर २०१७.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए. ०४१७/प्र. क्र. ७१/राउशु-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा ) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५ वा ) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ब), (फ), (ग) आणि (ह१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना नियम “ महाराष्ट्र देशी मद्य नियम (तिसरी सुधारणा) नियम, २०१७ ” असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे) च्या नियम २४ मधील उप-नियम ४ मध्ये खंड (क १) मध्ये खालील परंतुक समाविष्ट करण्यात यावा जसे की—

“ परंतु असे की, जर महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत किंवा कटकमंडळे या क्षेत्रातून राष्ट्रीय अथवा राज्य महामार्ग गेल्यास त्यांना उपरोक्त अंतरनिर्बंध लागू राहणार नाहीत ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सह सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 29th December 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. BPA. 0417/CR-71/Exc-2.—Whereas the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (b),(f),(g) and (h1)of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973 as follows namely :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Third Amendment) Rules, 2017.

2. In rule 24 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973 in sub-rule (4), to Clause (c1) the following proviso shall be inserted namely :—

" Provided that, if such National or State Highway passes through Municipal Corporation, Municipal Council, Nagar Panchayat or Cantonment Board area, such distance restrictions shall not apply ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.